# अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय,

३०२,वेक फिल्ड हाऊस,३रा मजला, ब्रिटानिया रेस्टोरंट जवळ, बॅलार्ड इस्टेट, फोर्ट, मुंबई४००००१.

दूरध्वनीक्र.०२२-२२६९४९८४/८५, Email:dcfmangrovecell@gmail.com/konkanmangroves@gmail.com


**विषय :- मौजे एरंगळ गाव, मालाड (प) ता. बोरीवली जि.मुंबई उपनगर या जागेवर कांदळवनाची बेसुमार कत्तल व भरणी केलेबाबत.**
**श्री. अमजद खान. (तक्रार क्र. 168)**

जा.क्र./ल. ले/समिती/253 /सन २०२२-२३
फोर्ट, मुंबई - ४००००१ दिनांक:- 13/01/2023

**प्रति,**

**मा. उपायुक्त (महसूल) तथा पदसिध्द विशेष कार्य अधिकारी,**
**मुख्यमंत्री सचिवालय कक्ष (CMO) कोकण विभाग,**
**कोकण भवन, नवी मुंबई.**

**संदर्भ:-** 1. मुख्यमंत्री सचिवालय कक्ष (CMO) कोकण विभाग, कोकण भवन यांच्या कार्यालयाचे पत्र क्र.मशा/सिएमओ/कक्ष -1/कोकण विभाग/रजि.क्र. 302/22 (कावि-980)/जा.क्र.716/2022 दिनांक 22.11.2022

2. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे कार्यालयाचे पत्र क्र:सी/कार्या-2 आय/कांदळवन/कावि-670/2021 दिनांक 24.08.2022 (प्रत संलग्न)

3. विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक यांचे कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-9/जमिन/1484/सन 2022-23 दिनांक 04.07.2022. (प्रत संलग्न)

उपरोक्त संदर्भ क्र.1 अन्वये विषयांकीत प्रकरणी उक्त कार्यालयाचे स्मरणपत्र कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीस प्राप्त झाले आहे. सदर पत्राचे अवलोकन केले असता तक्रारदार श्री. अमजद खान, सामाजिक कार्यकर्ता यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने केलेली कार्यवाहीची प्रत मुख्यमंत्री सचिवालय कक्ष (CMO) कोकण विभाग यांस कळविण्याबाबत विचारणा केली आहे.

सदर तक्रारी संदर्भात, संदर्भ क्र. 2 व 3 अन्वये, अनुक्रमे जिल्हाधिकारी मुंबई उपनगर व विभागीय वन अधिकारी यांसकडून प्राप्त झालेल्या अहवालाची छायांकित प्रत पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सोबत जोडण्यात येत आहे. कृपया त्याचे अवलोकन करावे. ही विनंती.

13/1/23

**सदस्य सचिव,**
**राज्य कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती**
**तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई**

सोबत : वरिलप्रमाणे.

प्रतिलिपी:- १. मा.अध्यक्ष, कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना माहितीसाठी सविनय सादर.

२. श्री. अमजद खान, सामाजिक कार्यकर्ता, रा.किशन दुधवाला चाळ, गावदेवी डोंगर, कॅम्पा रोड, अंधेरी पश्चिम, मुंबई 400 058 यांना माहितीस्तव.

मुंबई उपनगर

तक्रार क्र. 168

महाराष्ट्र शासन

**मुख्यमंत्री सचिवालय कक्ष (CMO) कोकण विभाग**

**कोकण भवन, १ ला मजला, नवी मुंबई- ४०० ६१४**

कोकण भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई- ४००६१४

**दूरध्वनी क्रमांक- २७५७२३३३ ईमेल-cmokonkandiv@gmail.com**

क्र. मशा/सिएमओ/कक्ष-१/कोकण विभाग/रजि.क्र. ३०२/२२(कावि-९८०) /जा.क्र. 716/ २०२२ दिनांक २२/११/२०२२

**मुख्यमंत्री सचिवालय कक्ष संदर्भ.** **स्मरणपत्र - १**

**प्रति,**

**मा. उपवन संरक्षक,**
कांदळवन कक्ष मुंबई बलार्डे ईस्टेट,
ब्रिटानिया अॅन्ड कंपनी रेस्टॉरंट फोर्ट,
मुंबई ४००००१.

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई
आवक क्र. : 4237 दिनांक : 6/01/23
मुख्य लेखापाल अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक

विषय - मौजे एरंगळ गाव, मालाड (प), ता.बोरीवली, जि.मुंबई उपनगर येथील सी.टीएस. नं. भू.क्र. १८११, १८१२, १८१३, १८१४ या जागेवरी कांदळवनाची बेसुमार कत्तल व भरणी करुन त्यावर श्री. सलिम अब्दुल सत्तार कासमानी व इतर यांनी स्टुडीओचे बांधकाम करुन कांदळवनाचा —हास व सीआरझेड चे उल्लंघन केले असलेबाबत तसेच श्री. सलिम अब्दुल सत्तार कासमानी व इतर आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेचे संबंधित अधिका-यांनी संगनमताने न्यायालयाची दिशाभूल केलेबाबत......

संदर्भ - १) या कार्यालयाकडील पत्र क्र. मशा/सिएमओ/कक्ष-१/कोकण विभाग/रजि.क्र.३०२/ जा.क्र.५११/२०२२, दि.०८/०९/२०२२
२) श्री. अमजद खान, सामाजिक कार्यकर्ता, रा.अंधेरी पश्चिम, मुंबई यांचा या कार्यालयास प्राप्त दिनांक १७.११.२०२२ रोजीचा अर्ज.

महोदय

श्री. अमजद खान, सामाजिक कार्यकर्ता, रा. अंधेरी पश्चिम, मुंबई यांनी दिनांक ०७/०९/२०२२ रोजी वरिल विषयाबाबतचा अर्ज या कार्यालयात सादर केलेला होता. सदरचा अर्ज पुढील योग्य ती कार्यवाही करणेसाठी संदर्भिय पत्रान्वये आपले कार्यालयाकडे पाठविणेत आलेला आहे.

सदरच्या प्रकरणावर अद्याप पर्यंत कार्यवाही झालेली नसल्यामुळे, अर्जदार यांनी वरील विषयाचे अनुषंगाने पुन:श्च तक्रार अर्ज दिनांक १७/११/२०२२ रोजी मुख्यमंत्री सचिवालय (CMO) कक्षात दाखल केलेला आहे.

तरी आपल्या स्तरावरून अर्जातील अनुषांगिक मुददयावर योग्य ती चौकशी करुन व शासनाच्या प्रचलित कायदे/नियम/धोरणा नुसार उचित तात्काळ कार्यवाही करावी व अर्जदार यांस परस्पर कळविणेत यावे. तसेच त्याची एक प्रत विभागीय आयुक्त, कार्यालयातील मुख्यमंत्री सचिवालय कक्ष (CMO) कोकण भवन,या कार्यालयाकडे विनाविलंब पाठविणेत यावीत, ही विनंती.

**सोबत :-** दिनांक १७/११/२०२२ रोजीचे फेर तक्रारी अर्जाची छायांकित प्रत आहे.

(मकरंद प्र. देशमुख)
**उपायुक्त (महसूल) तथा**
**पदसिध्द विशेष कार्य अधीकारी**
**मुख्यमंत्री सचिवालय कक्ष**
**कोकण विभाग**

Mangrove & wetland committee



6/01/23

(3)

# जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१
ई.मेल :collectormsd@gmail.com

---

तक्रार क्र. 168

क्र.: सी/कार्या-२ आय/कांदळवन/कावि-६७१/२०२१
दिनांक : २४/०८/२०२२ 12815

प्रति,
मा. विभागीय आयुक्त, कोंकण विभाग,
कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई

**विषय :** मौजे एरंगळ गाव, मालाड (प), ता.बौरीवली येथील न.भू.क्र. १८११, १८१२, १८१३ व १८१४ या जागेवर कांदळवनाची बेसूमार कत्तल व भरणी करुन त्यावर श्री. सलीम अब्दुल सत्तार कासमानी व इतर यांनी स्टुडिओचे बांधकाम करुन कांदळवनाचा ऱ्हास व सी.आर.झेडचे उल्लंघन केलेबाबत...

**संदर्भ :** १.श्री. अजमद खान यांचा अर्ज दि.१६/१२/२०२१ व ३०/१२/२०२१.
२.आपलेकडील पत्र क्र.मशा/कार्या-९/वने/कावि- ३९८९३/२०२१ दि.२९/१२/२०२१ सोबत श्री.अजमद खान यांचा अर्ज दि.१६/१२/२०२१.
३. मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालयाकडील पत्र दि.०७/०४/२०२२.
४.उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांचेकडील अहवाल क्र.उविअ/ मुंपउ/कार्या-५/कावि-४७५/२०२२ दि. २८/०६/२०२२

कांदळवन कक्ष, मुंबई
1340
8/9/2022

महोदय,

08/IX/2022

उपरोक्त विषयांकित प्रकरणी संदर्भ क्र. १, २ व ३ अन्वये श्री.अजमद खान यांनीमौजे एरंगळ गाव, मालाड (प), ता.बौरीवली येथील न.भू.क्र. १८११, १८१२,१८१३ व १८१४ या जागेवर कांदळवनाची बेसूमार कत्तल व भरणी करुन त्यावर श्री. सलीम अब्दुल सत्तार कासमानी व इतर यांनी स्टुडिओचे बांधकाम करुन कांदळवनाचा ऱ्हास व सी.आर.झेडचे उल्लंघन केलेबाबत तक्रार या कार्यालयात दाखल केली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने या कार्यालयाकडून अवगत केलेनूसार उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांनी चौकशी करुन संदर्भ क्र. ४ अन्वये सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे. सदर माहितीच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे अहवाल सादर करणेत येत आहे.

| अ.क्र | तक्रारीचा विषय | कार्यवाहीचा तपशिल |
|---|---|---|
| १ | तक्रारदाराचे नाव व दिनांक | श्री. अजमद खान दि. १६/१२/२०२१ |
| २ | तक्रारीचा विषय | मौजे एरंगळ गाव, मालाड (प), ता.बौरीवली येथील न.भू.क्र. १८११, १८१२,१८१३ व १८१४ या जागेवर कांदळवनाची बेसूमार कत्तल व भरणी करुन त्यावर श्री. सलीम अब्दुल सत्तार कासमानी व इतर यांनी स्टुडिओचे बांधकाम करुन कांदळवनाचा ऱ्हास व सी.आर.झेडचे उल्लंघन केलेबाबत... |
| ३ | तक्रारीशी संबंधित जागेचा तपशिल उदा. स.नं. गावाचे नाव, तालुका | मौजे एरंगळ ता. बोरीवली न.भू.क्र. १८११, १८१२, १८१३ व १८१४ |

| | | |
|---|---|---|
| ४ | चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्यांचे नाव व पदनाम | श्री. संतोष लोहकरे, मंडळ अधिकारी गोरेगांव |
| ५ | चौकशीमध्ये आढळून आलेली परिस्थिती | सदर तक्रारींच्या अनुषंगाने उक्त नमूद अधिकारी / कर्मचारी यांनी स्थळपाहणी केली असून त्यानूसार पुढीलप्रमाणे वस्तुस्थिती दिसून येत आहे.<br>१.तक्रारीमध्ये नमूद मिळकत मौजे एरंगळ ता. बोरीवली येथील न.भू.क्र. १८११ ते १८१४ ही खाजगी मिळकत असून सदर जागेवर अंदाजे ४००० चौ.मी. इतक्या क्षेत्रावर मॅजिक स्टुडिओ असल्याचे दिसून आले. सदर स्टुडिओच्या चारही बाजूंनी संरक्षित भिंत बांधलेली असून, सदरची भिंत व त्यातील उभा असलेला स्टुडिओ सन २०१० च्या पुर्वीपासून असल्याचे स्थानिक चौकशीअंती समजून आले.<br>२.सदर स्टुडिओच्या पूर्व दिशेस कांदळवन असून, पश्चिम दिशेस मढ मार्वे रोड असल्याचे दिसून आले. तसेच उत्तर दिशेस खाजगी मिळकत असून दक्षिणेस कच्चा रस्ता व शांतीनगर झोपडपट्टी असल्याचे दिसून आले. सदर जागेवर आजरोजी कांदळवनाचा ऱ्हास तसेच नव्याने बांधकाम केल्याचे दिसून आले नाही.<br>३.प्रकरणी मौजे एरंगळ ता. बोरीवली येथील न.भू.क्र.१४३२ क्षेत्र-१०७.६८४२, न.भू.क्र.२२६८ क्षेत्र-०.४५ व न.भू.क्र.७९ क्षेत्र १.५ असे भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम ४ अन्वये राखीव वने म्हणूण अधिसूचित झालेले एकूण १०९.६३४२ हे.आर. क्षेत्र दि.३०/०५/२०२२ रोजीच्या ताबा पावतीन्वये कांदळवन कक्षाचे ताब्यात देण्यात आलेले आहे.<br>४. प्रकरणी उक्त तक्रारीमध्ये नमूद जागा ही अधिसुचित कांदळवनापासून ५०मीटरचे आत येत असल्याने पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी कांदळवन विभागाकडे वर्ग करावे तसेच सदरचे क्षेत्र CRZ ने बाधित आहे किंवा CRZ तरतूदींचे उल्लंघन झाले आहे किंवा कसे ? याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे कार्यालयाकडून अहवाल प्राप्त करुन घ्यावा, असे नमूद करुन अहवाल सादर केलेला आहे.<br>उपरोक्त अहवालाचे अवलोकन केले असता, तक्रारीमध्ये नमूद ठिकाणी आजरोजी कांदळवनाचा ऱ्हास झालेला दिसून येत नाही. प्रकरणी सदरचे क्षेत्र CRZ ने बाधित आहे किंवा CRZ तरतूदींचे उल्लंघन झाले आहे किंवा कसे ? याबाबत सहा. आयुक्त, पी/उत्तर विभाग, बृहन्मुंबई महानगरपलिका यांना चौकशी करुन अहवाल सादर करणेकामी या कार्यालयाकडील दि.२४/०८/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविणेत आले आहे. |

| | | |
|---|---|---|
| ६ | कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे किंवा नाही. | स्थळपाहणीवेळी जागेवर कांदळवनाचा ऱ्हास / तोड झाल्याचे दिसून आले नाही. |
| ७ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास, दाखल केलेला गुन्हा क्रमांक, दिनांक व संबंधित पोलीस स्थानकाचे नाव | - |
| ८ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास, ज्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे त्या व्यक्तींची नावे व पत्ता | - |
| ९ | कोणत्या कायद्याअंतर्गत/कलमाअंतर्गत गुन्हा दाखल केला त्याचे वर्णन | - |

**उपरोक्त प्रमाणे उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल व अनुषंगिक कागदपत्रे आपले माहितीसाठी सविनय सादर.**

(डॉ. विकास नाईक)
**निवासी उपजिल्हाधिकारी,**
**मुंबई उपनगर जिल्हा**

स्थळ प्रतिवर मा. समन्वय अधिकारी,
कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती
तथा अपर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांची सही असे.

**प्रत : माहितीसाठी.**

१. सदस्य सचिव,कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती तथा उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई ३०२, वेक फिल्ड हाऊस, ३ रा मजला, ब्रिटानिया रेस्टोरंटजवळ, बॅलार्ड इस्टेट,फोर्ट, मुंबई.
२. श्री. अजमद खान,किशन दुधवाला चाळ, गावदेवी डोंगर, कॅम्पा रोड, अंधेरी (प), मुंबई- ४०० ०५८.

Cmo/22 23193 10/90
२आय

महाराष्ट्र शासन

# उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, ९ वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पू), मुंबई-४०० ०५१
ईमेल- sdomsdest@gmail.com
दूरध्वनी क्रं. ०२२-२६५१०१३६

क्रमांक : उविअ/मुंपउ/कार्या-५/कावि-४७५/२०२२
दिनांक : २८/०६/२०२२

प्रति,
मा. जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय
13 JUL 2022

**विषय :** मौजे एरंगळ गांव, मालाड (प.), ता. बोरीवली येथील न. भू. क्र. १८११, १८१२, १८१३, १८१४ या जागेवर कांदळवनाची बेसुमार कत्तल व भरणी करून, त्यावर श्री. सलीम अब्दुल सत्तार कासमानी व इतर यांनी स्टुडीओचे बांधकाम करून कांदळवनाचा ऱ्हास व सीआरझेड चे उल्लंघन केले असलेबाबत तसेच श्री. सलीम अब्दुल सत्तार कासमानी व इतर आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेचे संबंधित अधिकाऱ्यांनी संगनमताने न्यायालयाची दिशाभूल केलेबाबत...

**संदर्भ :** १) आपलेकडील पत्र क्र. सी/कार्या-२आय/ कावि- ६७१/२०२१ दि. २७/१२/२०२१
२) तहसीलदार बोरीवली यांचेकडील पत्र क्र.तह.बोरी/टे-२/कावि – २६५/२०२२, दि. ०८/०६/२०२२

महोदया,

उपरोक्त विषयांकीत प्रकरणी आपल्याकडील संदर्भीय पत्र क्र. १ सोबत प्राप्त झालेला श्री अजमद खान यांचा दि. १६/१२/२०२१ रोजीचा तक्रार अर्ज या कार्यालयात पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला होता. सदर अर्जात तक्रारदार यांनी मौजे एरंगळ गांव, मालाड (प.), ता. बोरीवली येथील न. भू. क्र. १८११, १८१२, १८१३, १८१४ या जागेवर कांदळवनाची बेसुमार कत्तल व भरणी करून, त्यावर श्री. सलीम अब्दुल सत्तार कासमानी व इतर यांनी स्टुडीओचे बांधकाम करून कांदळवनाचा ऱ्हास व सीआरझेड चे उल्लंघन केले असलेबाबत तसेच श्री. सलीम अब्दुल सत्तार कासमानी व इतर आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेचे संबंधित अधिकाऱ्यांनी संगनमताने न्यायालयाची दिशाभूल केलेबाबत केलेला तक्रार अर्ज पुढील कार्यवाहीसाठी तहसीलदार बोरीवली यांचेकडे पाठविला असता, तहसीलदार बोरीवली यांनी संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये खालील प्रमाणे अहवाल सादर केला आहे.

| अ.क्र. | तक्रारीचा तपशिल | कार्यवाहीचा तपशिल |
|---|---|---|
| १ | तक्रारदाराचे नाव व दिनांक | श्री. अजमद खान, दि. १६/१२/२०२१ |
| २ | तक्रारीचा विषय | मोजे- एरंगळ गांव, मालाड (प), ता. बोरीवली, येथील |



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | | (CTS), न.भू.क्र. १८११ १८१२, १८१३. १८१४ या जागेवर कांदळवनाची बेसुमार कत्तल व भरणी करून, त्यावर श्री. सलीम अब्दुल सत्तार कासमानी व इतर यांनी स्टुडीओचे ।बांधकाम करून कांदळवनाचा -हास व सीआरझेड चे उल्लंघन केले असलेबाबत तसेच श्री. सलीम अब्दुल सत्तार कासमानी व इतर आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेचे संबंधित अधिका-यांनी संगनमताने न्यायालयाची दिशाभूल केलेबाबत. |
| ३ | तक्रारीशी संबंधीत जागेचा तपशिल उदा स.नं. गावाचे नाव, तालुका | मौजे-एरंगळ, ता. बोरीवली. न. भू.क्र. १८११. १८१२. |
| ४ | चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्यांचे नाव व पदनाम | श्री. संतोष लोहकरे, मंडळ अधिकारी, गोरेगांव |
| ५ | चौकशीमध्ये आढळून आलेली परिस्थिती | 1. तक्रारीत नमूद मिळकत मोजे एरंगळ ता. बोरीवली येथील न.भू.क्र. १८११, १८१२, १८१३. १८१४ ही खाजगी मिळकत असून, सदर जागेवर अंदाजे ४००० चौ. मी. इतक्या क्षेत्रावर मॅजिक स्टुडीओ असल्याचे दिसून आले. सदर स्टुडीओच्या चारही बाजूंनी संरक्षित् भिंत बांधलेली असून, सदरची भिंत व त्यातील उभा असलेला स्टुडीओ सन २०१० च्या पूर्वीपासून असल्याचे स्थानिक चौकशीअंतीं समजून आले.<br>2. सदर स्टुडीओच्या पूर्व दिशेस कांदळवन असून, पश्चिम दिशेस मढ मार्वे रोड असल्याचे दिसून आले. तसेच उत्तर दिशेस खाजगी मिळकत असून, दक्षिण दिशेस कच्चा रस्ता व शांतीनगर झोपडपटटी असल्याचे दिसून आले. सदर जागेवर आज रोजी कांदळवनाचा -हास तसेच नव्याने । बांधकाम केल्याचे दिसून आले नाही.<br>3. प्रकरणी मा. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडील पत्र क्र. कार्या- २ आय/कावि एरंगळ/का.क्षे./हस्तांतरण २०२२ दि. १८/०४/२०२२ रोजीच्या आदेशानुसार मोजे एरंगळ ता. बोरीवली येथील स. क्र. १४५. न.मू.क्र. १४३२. क्षेत्र १०७.६८४२, न.भू.क्र.२२६८ क्षेत्र ०.४५. न.भू.क्र. ७९ क्षेत्र १.५ चौ. मी. असे एकुण क्षेत्र १०९,६३४२ चौ.मी. इतक्या मिळकतीचे अधिसुचित करण्यात आलेले असून, दि. ३०/०५/२०२२ रोजी कांदळवन कक्षाचे ताब्यात देणेत आलेले |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | | आहे.<br>4. प्रकरणी वरील तक्रारीतील जागा ही कांदळवन अधिसूचित केलेल्या जागेपासून 50 मिटरचे आत येत असल्याने, पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी कांदळवन विभागाकडे वर्ग करण्यात यावे असे मत आहे. तसेच सदरचे क्षेत्र CRZ ने बाधीत आहे किंवा CRZ चे उलंघन केले आहे किंवा कसे? याबाबत मुंबई महानगर पालिका पी/उत्तर यांचे कार्यालयाकडून सविस्तर अहवाल प्राप्त करण्यासाठी आपले स्तरावरून लिहून जाणेस विनंती आहे. |
| ६ | कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे किंवा कसे | स्थळपहाणीवेळी जागेवर कांदळवन तोड/ऱ्हास झाल्याचे दिसून आले नाही |
| ७ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास, दाखल केलेला गुन्हा क्रमांक व दिनांक संबंधीत पोलिस स्थानकाचे नाव | - |
| ८ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास, ज्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे त्या व्यक्तींची नावे व पत्ता. | - |
| ९ | कोणत्या कायदयाअंतर्गत/कलमाअंतर्गत गुन्हा दाखल केला त्याचे वर्णन | |

उपरोक्त प्रमाणे अहवाल पुढील कार्यवाहीसाठी यासोबत सविनय सादर करण्यात येत आहे. सोबत तहसीलदार बोरीवली यांचेकडील दि.०८/०६/२०२२ रोजीचा अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे सादर करण्यात येत आहेत. तरी सदरची तक्रार निकाली काढण्यास व यादीतून वगळण्यास विनंती आहे.

(उमेश बिरारी)
**उपविभागीय अधिकारी,**
**मुंबई पश्चिम उपनगर**



Scanned by CamScanner

दिनांक :- ३०/५/२०२२

**पंचनामा**

आम्ही पंच लोक खालील सह्या करतो की
राहणार - ग्राम [illegible] गाव मार्वे रोड मालाड (प)
निवारे पत्रक लिहून देतो की मा. जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालयाकडील क्र. भूमि-२
आज) म्हणणे - [illegible] / ल.क्षे./हस्तांतरण/२०२२ दिनांक
१८/४/२०२२/५३६४ चे आदेशानुसार नगर भूमापन
अधिकारी, गोरेगाव यांचे कार्यालयातील परि. भूमापक
अधिकारी, गोरेगाव, तलाठी मालाड गोरेगाव व
मंडळ अधिकारी, गोरेगाव, तलाठी [illegible] वनपाल, अंधेरी, वनसंरक्षक
व कांदळवन विभागाकडील वनपाल, अंधेरी, वनसंरक्षक
मालवणी येथे संबंधित कांदळवन जागा रोजी
ताबा देणे घेणे कामी उपस्थित होते. सदरचा
ताबा देणे घेणे कामी न.भू.क्र. १४३२ च्या
~~[illegible]~~ अंदाजे कांदळवन क्षेत्रात अंदाजे १०० ते १२५ कच्च्या
पक्क्या झोपड्या आहेत. याठिकाणी रस्त्याने जाग [illegible] आहे
[illegible] पश्चिम दिशेस जीपीएस रिडींग ① १९०९२५.३५,
७२७५२०.३४ ② १९०९-२८.५३, ७२७५९२.०८ या दरम्यान
पक्क्या भिंतीचे बांधकाम दिसून आले. उर्वरित ~~[illegible]~~
पश्चिम ~~दिशेस~~ अतिक्रमण विरहित जागा दिसून आली.
उत्तरेस कांदळवन लगत चार पाच गुंठ्यांमध्ये ~~[illegible]~~
अनधिकृत कच्चे बांधकाम आहे. उर्वरित भागात
अतिक्रमण विरहित आहे.

न.भू.क्र. २२६८, हा कांदळवन आहे
त्याठिकाणी अतिक्रमण विरहित आहे. तसेच
न.भू.क्र. ७८ हा कांदळवन असून अतिक्रमण

दिसून आलो. बाबत नं. क्र. १४३२-, २२८८ व ५८ क्रमांक वगैरे सात्या झाले होते. प्रत्यक्ष जागेवर जाऊन तिथली योग्य रिडींग घेऊन त्याची खात्री करून पंचनामा केलेला गोष्टी आहे त्याप्रमाणे प्रत्यक्ष जागेची परिस्थिती जाणून बाबत पंचनामा वाचून स्वाक्षांकित केली आहे.

Anu J

Anu S
933...

संपत . . .
( 9534022358

साक्षी

पंच

Panel

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव महाराष्ट्र वन विभाग

दूरध्वनीक्र.022-25220097

EmailId:dfommcu@gmail.com

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
वनविभाग
**विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक**
**यांचे कार्यालय**
ब-६८, कामगार नगर, टिळकनगर स्टेशन जवळ, कुर्ला (पूर्व), मुंबई ४०००२४

जा.क्र. कक्ष-९/जमिन/ 756 / सन २०२२-२३ दिनांक. 04 /07 /२०२२

प्रति,
सदस्य सचिव,
राज्य कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती,
तथा उप वनसंरक्षक,
कांदळवन कक्ष, मुंबई

विषय — मौजे एरंगळ गाव, मालाड (प) ता. बोरीवली जि. मुंबई उपनगर या जागेवर कांदळवनाची बेसुमार कत्तल व भरणी केलेबाबत.. श्री. अमजद खान (तक्रार क्र. १६८)

संदर्भ - १. आपलेकडील पत्र क्र. ल.ले/समिती/०५/२०२२-२३ दि. ०७/०४/२०२२
२. मा. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे कार्यालयातील पत्र क्र.सी/कार्या-२आय/कांदळवन/ कावि-६७१/१७९६०/२०२१ दिनांक २७/१२/२०२२
३. वनक्षेत्रपाल पश्चिम मुंबई यांचेकडील पत्र क्र. अंधेरी तक्रार/१३५९/दि. ०४/०२/२०२२.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी संदर्भिय पत्र क्र. १ अन्वये आपलेमार्फत श्री. अमजद खान यांचा तक्रारी अर्ज या कार्यालयात प्राप्त झाला आहे. तसेच संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये सदर तक्रारी अर्ज या कार्यालयात कांदळवन समिती अंतर्गत देखील प्राप्त झाले होते. त्याअनुषंगाने वनक्षेत्रपाल पश्चिम मुंबई यांनी संदर्भिय पत्र क्र. ३ अन्वये अहवाल खालील प्रमाणे सादर केलेला आहे.

१. सदर तक्रारी अर्जातील नमूद क्षेत्र हे मौजे एरंगळ गाव मास्तर वाडी मालाड (प) न.भू.क्र.१८११, १८१२, १९१४ मधील आहे.
२. तक्रारी अर्जातील नमूद क्षेत्र हे अधिसुचित कांदळवन क्षेत्र नाही.
३. तक्रारीतील नमुद क्षेत्र हे अधिसुचित कांदळवनापासून ५० मी. पेक्षा कमी अंतरावर आहे.
४. स्थळपाहणीच्या वेळी प्रत्यक्ष जागेवर घेतलेले जी.पी.एस. रिडींग खालील प्रमाणे-
   १. N १९ ०९ ०३.२३ E ७२ ४७ ३१.०९
   २. N १९ ०९ ०१.८० E ७२ ४७ ३१.५९
५. वरील जी.पी.एस. रिडींग गुगल अर्थवर घेऊन MRSAC नकाशावर सुपर इंम्पोज करुन तपासले असता सन २००५ साली नमूद जागेवर कांदळवन दिसुन येत नाही. तसेच सद्यस्थितीत नमुद जागेवर कांदळवन दिसून येत नाही.
६. तक्रारीतील नमुद क्षेत्र खाजगी क्षेत्र आहे. परंतु सदर क्षेत्र बफर झोन मध्ये असलेने सदर तक्रारीवर महसुल विभागामार्फत कार्यवाही होणे आवश्यक आहे

उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई
आवक क्रमांक 220
दिनांक 11/07/022
मुख्य लेखापाल

(एम. आदर्श रेड्डी)
विभागीय वन अधिकारी
मुंबई कांदळवन संधारण घटक

प्रतिलिपी - मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक,कांदळवन कक्ष,मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
प्रतिलिपी - सहाय्यक वनसंरक्षक, कांदळवन संरक्षण, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.

वनपरीक्षेत्र अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक पश्चिम मुंबई, यांचे कार्यालय
स. न. 147 पंचम सोसायटी जवळ, गोखले महाविद्यालय मार्ग, गोराई, बोरीवली (प.) 400 091
Email:- rfomangrovewm@gmail.com

विभागीय वन अधिकारी,
मुंबई कांदळवन संधारण घटक
[illegible]
आवक क्रमांक - 2390
दिनांक - 11/02/22
वनकर्मचारी विभागीय वन अधिकारी

विषय:. मौजे एरंगळ गाव मालाड (प) ता. बोरीवली जि.मु. (उपनगर) येथील (cts) 1811,1812,1914 या जागेवर कांदळवनाची बेसुमार कत्तल व भरणी करून यावर श्री. सलीम अब्दुल सत्तार कारमांनी व इतर यांनी स्टुडिओचे बांधकाम करून कांदळवनाचा ऱ्हास व सीआरझेड चे उल्लंघन केले असलेबाबत तसेच श्री.सलीम अब्दुल सत्तार कासमानी व इतर आणि बृहन्मुंबई महानगरपाहलिकेचे संबंधित अधिकाऱ्यांनी संगनमताने न्यायालयाची दिशाभुल केलेबाबत.

जा.क्र. प.मुंबई /अंधेरी तक्रा./ 1359 /२०२१-२२
बोरीवली दि: 04/02/2022

प्रति,
मा. विभागिय वनअधिकारी,
मु.का.सं.घ. कुर्ला

संदर्भ : वनपाल अंधेरी यांच्या कडील जा.क्र.प.मुंबई/अंधेरी तक्रा./247/2021-22 बोरीवली दि.28/01/2022
मुळ तक्रारदारचे नाव : श्री.अमजद खान यांचा दि. 16 डिसेंबर 2021 अर्ज.
पत्ता व फोन नं. : किशन दुधवाला चाळ,गावदेवी डोंगर,कॅम्पा रोड,अंधेरी(प),मुंबई-400058 9820717153

महोदय,

उपरोक्त संदर्भान्वये विषायांकित प्रकरणी श्री.अमजद खान यांचा मौजे एरंगळ गाव न.भू.क्र.1811,1812,1914 मधील तक्रार अर्जाबाबतचा मुद्देनिहाय अहवाल सादर करण्यात येत आहे तो खालीलप्रमाणे.

१. स्थळाचे वर्णन:- मौजे एरंगळ गाव मास्तर वाडी मालाड (प) न.भू.क्र.1811,1812,1914

२. तक्रारीचा तपशील- :. कांदळवनाचा -हास करून बांधकाम केलेबाबत.

३. स्थळाचे जी.पी.एस.रिडींग – 1) N 19 09 03.23 E 72 47 31.09
2) N 19 09 01.80 E 72 47 31.59

४. Geo tag Photo – सोबत जोडले आहे.

५. स्थळपंचनामा- सोबत जोडला आहे.

६. तक्रार क्षेत्राचा वैधानिक दर्जा-

अ) तक्रारीत नमूद क्षेत्र अधिसुचित कांदळवन क्षेत्र आहे का? असल्यास अधिसुचना क्र. — नाही

ब) सदरच क्षेत्र बफर झोन मध्ये येते का? असल्यास अंतर (मी) — होय. तक्रारीतील नमुद जागा कांदळवनापासून 50मी. पेक्षा कमी अंतरावर आहे.

क) सदरचे क्षेत्र खाजगी कांदळवन क्षेत्र आहे का ? — नाही

ड) सदरचे क्षेत्र सरकारी क्षेत्र आहे का? — नाही

७. सन ३१ डिसेंबर २००५ रोजी MRSAC Map नुसार नमुद जागेवर कांदळवन होते का ? — नाही

८ सद्यास्थितीत नमुद जागेवर कांदळवन आहे किंवा कसे याबाबत सुस्पष्ट अभिप्राय. — कांदळवन दिसून येत नाही परंतु जुने बांधकाम केलेला स्टुडिओ आहे.

९. अधिसुचित कांदळवन क्षेत्र असल्यास प्रथम गुन्हा नोंद केला आहे का? — अधिसुचित कांदळवन क्षेत्र नाही.

१०अधिसुचित कांदळवन क्षेत्रा व्यतिरीक्त क्षेत्र असल्यास संबधित यंत्रणेस लेखी कळविण्यात आले आहे का? — नमुद क्षेत्र खाजगी क्षेत्र आहे परंतु लगत कांदळवन असलेले क्षेत्र महसूल विभागाच्या ताब्यातील क्षेत्रापैकी आहे.

११. कार्यवाही कोणत्या विभागाने कार्यवाही करणे आवश्यक आहे- — महसूल विभाग

१२. वनक्षेत्रपाल यांचा तक्रारीच्या अनुषंगाने चौकशीचा स्वंयस्पष्ट अभिप्राय- — तक्रारीतील नमुद क्षेत्र महसूलविभाच्या ताब्यातील कांदळवनापासून 50 मी.चे आत येत आहे. त्यामु[ळे] महसूल विभागामार्फत कारवाई होणे आवश्यक आ[हे].

१३. वनक्षेत्रपाल यांचा सदरची तक्रार निकाली काढावी किंवा कसे याबाबतचा स्वयंस्पष्ट अभिप्राय - — सदरची तक्रार वनविभागाकडून निकाली काढण्या[त] यावी.

माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.

(एस.एम.देशपांडे)
वनपरीक्षेत्र अधिकारी,
मु.का.सं.घ., पश्चिम मुंबई

प्रत : तहसिलदार बोरीवली यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी सादर.

प्रत : श्री अमजद खान यांना माहितीसाठी.